इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या आकृतिबंधातील विश्लेषक व प्रोग्रामर (S-२०), सॉफ्टवेअर प्रोग्रामर (S-२३) व इन्फॉरमॅटिक्स असिस्टंट (S-१६) या पदांच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) भरतीसाठी स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती निश्चित करण्यासाठी तज्ज्ञ समिती गठीत करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग
शासन निर्णय क्र.: समिती-२०२६/प्र.क्र.२७८/प्रशा-१ (E-1927117)
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ:- १. सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. शाकानि-२०२६/प्र.क्र.२०/र.व.का.-१, दि. २१ एप्रिल, २०२६.
२. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, शासन निर्णय क्र. आकृती-२०२६/प्र.क्र.०२/ प्रशा-१, दि. २४/०४/२०२६.

प्रस्तावना :

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचा शासन निर्णय दिनांक २४/०४/२०२६ अन्वये विभागाचा स्वतंत्र आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. सदर आकृतिबंधामध्ये तांत्रिक शाखेंतर्गत विविध पदे निर्माण करण्यात आली असून, त्यामध्ये प्रामुख्याने संचालक (तांत्रिक), सहसंचालक, सहाय्यक संचालक, विश्लेषक व प्रोग्रामर, सॉफ्टवेअर प्रोग्रामर व इन्फॉरमॅटिक्स असिस्टंट इत्यादी पदांचा समावेश आहे. सदर पदांपैकी विश्लेषक व प्रोग्रामर (S-२०), सॉफ्टवेअर प्रोग्रामर (S-२३) व इन्फॉरमॅटिक्स असिस्टंट (S-१६) ही तीन पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येणार आहेत.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये गेल्या काही वर्षांत अत्यंत वेगाने बदल होत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), मशीन लर्निंग (Machine Learning), डेटा ॲनालिटिक्स (Data Analytics), बिग डेटा (Big Data), क्लाउड कम्प्युटिंग (Cloud Computing), सायबर सुरक्षा (Cyber Security), सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, ऑटोमेशन, डेटाबेस मॅनेजमेंट, डिजिटल गव्हर्नन्स इत्यादी क्षेत्रांमध्ये सातत्याने नवीन तंत्रज्ञान, साधने व कार्यपद्धती विकसित होत आहेत. तसेच, शासकीय विभागांच्या कामकाजामध्ये डिजिटल प्रणालींचा वाढता वापर, विविध शासकीय सेवांचे संगणकीकरण, डेटा आधारित निर्णयप्रक्रिया, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, सॉफ्टवेअर प्रणालींचे व्यवस्थापन व विकास, सायबर सुरक्षा आणि डिजिटल पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन यांसारख्या बाबींचे महत्त्व वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर, उपरोक्त तीन पदांसाठी केवळ पारंपरिक संगणकविषयक ज्ञानावर आधारित अभ्यासक्रम निश्चित करणे पुरेसे ठरणार नाही. सदर पदांच्या कामाचे स्वरूप, पदनिहाय कर्तव्ये व जबाबदाऱ्या, आवश्यक तांत्रिक कौशल्ये, सध्याच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रचलित अभ्यासक्रम तसेच नामांकित IT कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष वापरण्यात येणारी आधुनिक तंत्रज्ञान साधने (Industry Standard Tools and Technologies) विचारात घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, उमेदवारांकडे केवळ सैद्धांतिक ज्ञान न राहता प्रत्यक्ष कामकाजासाठी आवश्यक असलेली तांत्रिक समज, समस्या निराकरण क्षमता, विश्लेषणात्मक दृष्टिकोन, प्रोग्रामिंग कौशल्ये आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची क्षमता आहे किंवा नाही, याचीदेखील स्पर्धा परीक्षेद्वारे पडताळणी होणे आवश्यक आहे.

सबब, सदर पदांच्या भरतीसाठी अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती निश्चित करताना तांत्रिक शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित कंपन्यांचे अनुभवी प्रतिनिधी यांचे मार्गदर्शन घेणे उचित ठरेल. त्याअनुषंगाने सदर प्रयोजनार्थ शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभाग असलेली समिती गठीत करून सदर पदांसाठी पदनिहाय अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या आकृतिबंधातील विश्लेषक व प्रोग्रामर (S-२३), सॉफ्टवेअर प्रोग्रामर (S-२०) व इन्फॉरमॅटिक्स असिस्टंट (S-१६) या पदांच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरतीसाठी परीक्षेचा अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे तज्ज्ञ समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	समितीवरील पदनाम / प्रतिनिधित्व	समितीमधील भूमिका
१.	आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता	अध्यक्ष
२.	भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT), मुंबई यांच्याकडून नामनिर्देशित विषयतज्ज्ञ	सदस्य
३.	वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट (VJTI), मुंबई यांच्याकडून नामनिर्देशित विषयतज्ज्ञ	सदस्य
४.	कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे (COEP) यांच्याकडून नामनिर्देशित विषयतज्ज्ञ	सदस्य
५.	Indian Institute of Science Education and Research, Pune (IISER Pune) यांच्याकडून नामनिर्देशित करण्यात येणारे विषयतज्ज्ञ	सदस्य
६.	Infosys कंपनीकडून नामनिर्देशित वरिष्ठ तांत्रिक प्रतिनिधी	सदस्य

७.	Tata Consultancy Services (TCS) कंपनीकडून नामनिर्देशित वरिष्ठ तांत्रिक प्रतिनिधी	सदस्य
८.	उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग	सदस्य
९.	उप सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग	सदस्य-सचिव

उपरोक्त सदस्यांव्यतिरिक्त अध्यक्ष समितीच्या बैठकीस आवश्यकतेनुसार अन्य अधिकारी तसेच इतर विषयतज्ज्ञ यांना निमंत्रित करू शकतील.

२. **समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे (Terms of Reference) असेल :**

२.१ विश्लेषक व प्रोग्रामर, सॉफ्टवेअर प्रोग्रामर व इन्फॉरमॅटिक्स असिस्टंट या पदांच्या कामाचे स्वरूप व जबाबदाऱ्या विचारात घेऊन स्वतंत्र व पदनिहाय अभ्यासक्रम निश्चित करणे. सदर अभ्यासक्रम संबंधित पदांच्या शैक्षणिक अर्हतेशी व अपेक्षित कामकाजाशी सुसंगत राहील याची दक्षता घेणे.

२.२ नामंकित तांत्रिक शिक्षण संस्थांमध्ये संबंधित विषयांसाठी शिकविण्यात येणारे पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रम तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत अभ्यासक्रम व प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate courses) विचारात घेऊन त्याचा आवश्यकतेनुसार पदनिहाय अभ्यासक्रमात समावेश करणे.

२.३ माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सध्याचे व उदयोन्मुख विषय आवश्यकतेनुसार पदनिहाय अभ्यासक्रमात समावेश करण्याबाबत विचार करणे.

२.४ नामंकित IT कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष वापरण्यात येणाऱ्या Programming Languages, Software Development Frameworks, Database Tools, Data Analytics Tools, Cloud Platforms, Cyber Security Tools, Testing Tools, Version Control Systems तसेच इतर Industry Standard Tools and Technologies यांचा अभ्यास करून आवश्यकतेनुसार पदनिहाय अभ्यासक्रमात समावेश करणे.

२.५ प्रत्येक पदासाठी विषयवार गुणांचे विभाजन, प्रश्नांची संख्या, परीक्षेचा कालावधी, गुणांकन पद्धती व प्रश्नपत्रिकेचे स्वरूप निश्चित करण्याबाबत शिफारस करणे. वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांबरोबरच आवश्यकतेनुसार परिस्थितीवर आधारित व समस्या निराकरणविषयक प्रश्नांचा समावेश करण्याचा विचार करणे.

२.६ उमेदवारांचे सैद्धांतिक ज्ञान, तांत्रिक समज, विश्लेषण क्षमता, तार्किक विचारक्षमता व प्रत्यक्ष कामकाजाशी संबंधित समस्या सोडविण्याची क्षमता यांची पडताळणी होईल, अशी परीक्षा पद्धती सुचविणे. आवश्यकतेनुसार संगणकाधारित परीक्षा किंवा प्रात्यक्षिक चाचणीचा समावेश करण्याबाबत शिफारस करणे.

३. समितीने स्थापन झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत शासनास सविस्तर अहवाल सादर करावा. अहवालामध्ये प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम, विषयवार गुणांचे विभाजन, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, परीक्षेचा कालावधी, पदनिहाय कौशल्यांची अपेक्षित पातळी व समितीच्या शिफारशी यांचा समावेश असावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२६११२६११४७११०२११ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.11.26 11:48:30 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य.
६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
७. संचालक, भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT), मुंबई.
८. संचालक, VJTI, मुंबई.
९. संचालक, COEP तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे.
१०. व्यवस्थापकीय संचालक, Infosys.
११. व्यवस्थापकीय संचालक, Tata Consultancy Services (TCS).
१२. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती.